I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 249-252

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# बालक पालक निकोप संबंध काळाची गरज

उषा खंडाळे

गृहअर्थशास्त्र विभाग, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

*Corresponding Author :- ushakhandale75@gmail.com

| Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023<br>Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

आजच्या आधुनिक युगात भारतीय परंपरा वाढत्या आधुनिकीकरणाच्या काळात, इंटरनेटच्या युगात मागे पडायला लागल्या आहेत. प्राचीन भारतातील कुटूंब व्यवस्था व सामाजिक रचनेचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की या रचनेला धार्मिक, सामाजिक पाठबळ होते. प्राचीन धर्मग्रंथात तर या नात्याला वेगवेगळ्या ऋतूच्या व कवितेच्या, धार्मिक कथेच्या आधारावर पुढच्या पिढ्यानकरिता संग्रहीत केले आहे. "पद्मपुराणाच्या सृष्टिखंड (४७/११) मध्ये ऋचेच्या तत्वात असे सांगतले आहे की

"सर्वतीर्थमयी माता सर्वदेवमय: पिता ।

मातरं पितरं तस्मात सर्वदेवमय: पुजतेता ।।"

परंतु आजच्या आधुनिक काळात बालक पालक संबंध हे मुलांच्या शारिरीक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकासाची गुरुकिल्ली असायला हवी परंतु आज ही गुरुकिल्ली हरवायला लागली आहे. बालक पालक संबंधाचा विकास करायला ही किल्ली जपायला हवी निकोप संबंधाचा आधार विकसित करायचा असेल तर त्याच्या पायऱ्याची रचना निराकार असायला हवी ही निकोपता टिकविण्याकरिता नात्यात सुरक्षितता, विश्वास, आदर, स्विकृती, प्रेमभावना गुणवत्ता इ. असावी हे घटक टिकविण्यासाठी पालक बालक निकोप संबंध आधुनिक काळाची गरज म्हणून जन्माला यायला हवी करिता लघुसंशोधनाच्या माध्यमातुन सदर विषयावर चर्चा करुन समस्या व त्यावरील उपाययोजना सुचना करण्यात येतील.

**मुख्यशब्द** : ऋचा, पद्मपुराण, खण्ड, सर्वतीर्थमयी, सृष्टीखंड

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिक काळातील सर्वात मोठी लोकांची शास्त्रीय सामाजिक गरज म्हणजे बालक पालक निकोप संबंध होय. या संबंधावर विचार करणे अगत्याचे आहे. वाढते तंत्रज्ञान, कुटूंबाचे बदलते स्वरुप, समाजाची बदलती मानसिकता, वाढते प्रश्न व जन्माला येणारे नविन प्रश्न, प्रश्नांचा गोतावळा सोडविण्यारिता बालक पालक सबंधावर मानसशास्त्रीय दृष्टीकोणातुन अध्ययन करणे आवश्यक आहे. मानसशास्त्राच्या मदतीने बालक पालक निकोप संबंधावर उपचार सांगता येतील संपूर्णता, सुगमता, मैत्री, खेळ, काळजी इत्यादी समस्यांची गोळाबेरीज करुन उपचार पध्दतीचा वापर केला जातो.

सध्या धावपळीच्या स्पर्धात्मक जगात आधुनिक काळातील पालकांचे होणारे दुर्लक्ष एक उग्र समस्या आहे. आपल्याला पालकांची गरज असतांना जर पालक जवळ नसतील तर अश्या काळात बालक—पालक संबंधात दुरावा वाढत जातो व या दुराव्याचे रुपांतर मोठ्या स्वरुपात होते. बालक त्याला होणाऱ्या समस्यांची उकल करायला पालक तयार नसल्याने किंवा दबावा अभावी तो राग पालकांवर व्यक्त करु शकत नाही त्यामुळे त्यांच्या नात्यात दरी वाढत जाते व ही दरी कमी करायला वेळेच्या आत पालक उपलब्ध नसतील तर बालकाच्या मनावर त्याचा परिणाम होऊन त्याचे रुपांतर व्देषात होते.

आधुनिक काळात वाढलेल्या समस्यांचे निश्चित स्वरुपात वर्गीकरण करणे शक्यच नाही. बालकाची वाढती व्यवसनाधिनता, बुजरेपणा, चिडखोरपणा, शिक्षणातील स्पर्धा इत्यादी अनेक समस्यांनी बालक ग्रासलेला असतो त्यामुळे तो व्यक्त न होता अंधारात ओढला जातो आणि पालक वर्ग अनभिन्न भुमिकेत असतात.

**उद्देश:**

१) पालक बालक निकोप संबंधाची पार्श्वभुमी अभ्यासणे व आधुनिक काळातील संबंधाच्या समस्या अभ्यासणे.

२) आधुनिक काळातील बालक पालक संबंध टिकविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३) बालक पालक संबंधावर होत असलेल्या वेगवेगळ्या घटकांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१) आजच्या काळात बालक पालक यांच्यात सुसंवादाचा अभाव.

२) बालक पालक संबंध दुरावण्यास आजची शिक्षण पध्दती, आधुनिक, बदलती, जिवनशैली, वाढलेली स्पर्धा, विभक्त कुटूंबे पध्दती जबाबदार आहे.

**बालक—पालक संबंध सिध्दांत — सिग्मंड फ्राईड आणि एरिकसन**

पुर्वीच्या संयुक्त कुटूंबाचे विभाजन होवून आज जास्तीत जास्त विभक्त कुटूंब झालीत, परिणामी मुलांना आजी आजोबाकडून जे संस्काराचे बाळकडू पाजल्या जायचे, मायेची उब मिळायची, सुरक्षिततेची भावना मुलांमध्ये असायची ते आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांना मिळत नाही. आई वडील दोघेही नोकरीवर अशावेळी मुलांना सांभाळण्याकरि घरी बाई ठेवतात किंवा पाळणाघराचा आधार घेतला जातो. अशावेळी पाल्यांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही. हळूहळू बालक आणि पालकांमधील दरी रुंदावत आहे याचा परिणाम मुल मानसिकदृष्ट्या कमकुवत होऊन आईवडिलांपासून भावनिकदृष्ट्या दुरावत आहे.

**बालक पालक निकोप सबंधाची पार्श्वभुमी:**

आधुनिक काळातील बालक पालक सबंध निकोप होण्यासाठी या संबंधाचया पार्श्वभुमीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे करिता खालील घटक पार्श्वभुमीच्या आधारावर अभ्यासणे आवश्यक ठरते.

१) प्राचीन काळातील बालक पालक संबंध

२) मध्ययुगीन काळातील बालक पालक संबंध

३) आधुनिक काळातील बालक पालक संबंध

**प्राचीन काळातील बालक पालक संबंध**

प्राचीन काळातील समाजरचेनचा विचार केला असता मुल जन्माला आल्यापासुनच त्यांच्या संगोपनाच्या तत्वाची पुर्तता करण्यात येत होती. आश्रमाच्या माध्यमातुन मानवी जिवनाच्या अवस्था वर्गीकृत करण्यात आल्या आहेत. त्यात सांगण्यात आले आहे की, बालकाला त्याच्या वाढीच्या काळात बालकाचा शारिरीक व मानसिक विकास झपाट्याने होतो. बालक पालक निकोप संबंधाचा धागा घट्ट होण्यास मदत होते.

आधुनिक काळातील बालक पालक संबंधाच्या समस्या

१) समाज व्यवस्था

२) विभक्त कुटूंब पध्दती

३) नोकरदार जाळे

४) इंटरनेटचे जाळे

५) आधुनिका काळातील स्पर्धा

१) समाजव्यवस्था : बालकाच्या विकासात समाजाचा मोठा वाटा असतो. समाजव्यवस्थेचा परिणाम कळत नकळतपणे होतांना दिसून येतो. समाज मानवाचा अवभिाज्य घटक आहे त्यामुळे समाजव्यवस्थेच्या घडामोडीत बालकाचे व्यक्तिमत्व फुलत असते. राजकारण, समाजकारण, शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्याय, पाश्चिमात्यांना प्रभाव, माहिती तंत्रज्ञान, नागरीकरण, भौतिक सुविधा या सर्व गोष्टी २१ व्या शतकातील वैशिष्ट्ये ठरलेली आहेत. तेव्हा या समाजव्यस्थेत घोडदौड करतांना नविन पिढीला यात समायोजन करतांना त्यांची व पालकांची दमछाक होते आणि या समाजरचेनत भुमिका चुकत जातात.

२) कौटूंबिक वातावरण: कौटूंबिक वातावरणात मुलांची समजिक, भावनिक, मानसिक, बौध्दिक, नैतिक, आर्थिक बाजु विकसित होत असते त्यामुळे कुटूंबाची रचना (संयुक्त, विभक्त) तसेच वातावरण, आई वडिलांचे संबंध, एकेरी पालकत्व, कुटूबातील संघर्ष, यासारख्या गोष्टींचा

प्रभाव बालक पालक संबंधावर पडतो. बालकांना आई वडिलांच्या सहवासाची फार गरज असते ती योग्य वेळी आणि पध्दतीने मिळाल्यास बालकाचा नैतिक विकासही चांगला घडून येतो.

३) तंत्रज्ञानाचे युग (इंटरनेटचे जाळ) : माहिती तंत्रज्ञानामुळे जग फार जवळ आले आहे असे म्हणण्यापेक्षा आपल्या ते हातात आलेले आहे असे म्हणणे वावगं ठरणार नाही. आज त्याचे काही फायदे झालेले आहे. तर त्यापेक्षा काही वेळेला तोट्यांना पण सामोरे जावे लागत आहे. तंत्रज्ञानाच्या आड पालकांनी केलेली स्वत:ची सोय ही त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण करणारी ठरत आहे. स्पर्धेच्या युगात डोईजड होणाऱ्या अपेक्षांचे डोंगर मुलांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात. बालगुन्हेगार, हॅकर्स हे या तंत्रज्ञानाचे एक रुप आहे.

४) स्पर्धा : बालक पालक सबंध खराब होण्याचे मोठे कारण म्हणजे स्पर्धा. प्रत्येक पालकांना आपल मुल स्पर्धेत अव्वलच असावा अये वाटतं. सतत इतरांशी केलेली तुलना स्पर्धेत टिकण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी त्यासाठी त्यांची होणारी धावपळीमुळे दोघांमधील नाते हे फक्त व्यवहारिकच होऊन राहतात.

**उपाययोजना:**

बालक विविध कारणांनी पालकांपासुन दुरावला गेला आहे. तेव्हा पालकांची सर्व स्तरावरची (नैतिक, भावनिक, आर्थिक, सामाजिक) जबाबदारी वाढली आहे. तेव्हा बालकाच्या विकासाचे तत्व त्यांचे मानसशास्त्र जाणून घेणे गरजेचे आहे.

१) विकासाची तत्वे : बालकाच्या विविध विकासाच्या टप्प्यानुसार वाढ व विकासाची तत्वे पालकांना माहित असावे. जेणेकरुन त्यानुसार त्यांची शारिरीक जडणघडणीत त्यांचा हातभार लागेल.

२) मानसशास्त्र : आजची मुले फार हुशार आहेत त्याचे कारण तंत्रज्ञानाचे युग म्हटल्या जाते. तेव्हा त्याचे विश्वही फार व्यापरक स्वरुपाचे असते. त्यांच्या आवडी निवडी त्यांचे स्वभाव, भावनिक घडण या सर्व गोष्टी आज पालकांनी जाणिवपूर्वक जाणून घेणे गरजेचे आहे.

३) बालकांसाठी वेळ : आजची मुले एकटे पणामुळे भरकटलेली दिसून येतात. हा एकटेपणा पालकांच्या नोकरीमुळे, विभक्त कुटूंबामध्ये एकल भावंडामुळे तसेच कामाच्या व्यस्ततेमुळे आलेला आहे. म्हणून मुलांना जितका जास्त सहवास लाभेल तेवढेच सुरक्षितता, आत्मविश्वास, आपुलकी, प्रेम या भावना बालकांमध्ये रुजल्या जातील.

४) संस्कृती: आधुनिक काळात भारतीय संस्कृती लोप पावत चालली आहे. पाश्चिमात्याच्या प्रभावाखाली पुढच्या पिढीपर्यंत संस्कृती लोप पावेल, विविध सण समारंभ, पूजापाठ, व्रतवैकल्य या सर्व गोष्टींना शास्त्राचा आधार देवून मुलांना यातुन, संयम, नैतिकता, सातत्य ,
चांगुलपणा, बांधीलकी, अहिंसा यासारख्या नैतिक मुल्यांची रुजवणूक आपल्या घरातुन होऊ शकते.

बालक पालक संबंध सुदढ करण्यासाठी काही नियम:

- लहान मुलांना कधीही नकारात्मक बोलु नये. उदा. नालायक, मुख्र कुठला, तुला जमत नाही, तु बुध्दू आहेस इ.
- शक्यतो मुलांना नाही म्हणायचे नाही कारण मुलांना नको करु म्हटले की जिज्ञासेपोटी मुल हमखास ती गोष्ट करतात.
- मुलांना वारंवार मारायच नाही.

**निष्कर्ष:**

१) पुरेसा वेळ देऊ न शकल्यामुळे पाल्यांमध्ये अनेक वर्तन समस्या निर्माण होत आहेत.

२) बालक पालक यांच्यात सुसंवाद होत नसल्याने मुले जास्त आत्मकेंद्री बनत आहेत.

३) बालक पालक संबंध दुरावण्यास आजची शिक्षण पध्दती बदललेली जिवनशैली, सामाजिक माध्यम, विभक्त कुटूंब पध्दती इ. घटक कारणीभुत ठरत आहेत.

**सुचना**

१) पालकांनी आपले विचार, मते बालकांवर लादू नये.

२) पालकांनी जास्तीत जास्त वेळ पाल्यांना द्यावा.

३) कुटूंबातील वातावरण वेळोवेळी बालकांना प्रोत्साहन देणारे असावे.

४) पालकांनी बालमानसशास्त्र समजून घ्यावे.

५) समुपदेशकाच्या सल्ल्याने वर्तनसमस्या हाताळाव्यात.

**संदर्भ :**

बाबतीवाले कुन्दा, बालक पालक स्त्रिया, ऋचा प्रकाशन, पुणे

वराडपांडे नलिनी, बालविकास शास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर

प्रेमला काळे, बालमानसशास्त्र

हिरवे, तडसर, वैकासिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर

बोरुडे, कुमोठकर, “वैकासीक मानसशास्त्र”